1.6

(82)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड  **P.S.(ठाणे):** भोकर  **Year (वर्ष):** 2022

   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0071  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/02/2022 20:17 बजे

2. 

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

   1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 28/02/2022

      **Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/02/2022

      **Time From (वेळेपासून):** 13:47 बजे

      **Time To (वेळेपर्यंत):** 13:47 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

   **Date (दिनांक ):** 28/02/2022  **Time (वेळ):** 19:44 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

   **Entry No. (नोंद क्र.):** 041  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/02/2022 19:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1. (a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 0.5 किमी

      **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय भोकर, ,भोकर जि नांदेड

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainent / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

   (a) **Name (नाव):** गणपत दिपसिंग राठोड

   (b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1957  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ.क्र.) | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address (पत्ता):**

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | नांदा बु तांडा ता भोकर ,भोकर ,भोकर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | नांदा बु तांडा ता भोकर ,भोकर ,भोकर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सन्हारा मधुकरराव जवळेकर | | | 1. अष्टविनायक नगर, पवार कॉलनी,भोकर ,भोकर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादिदिनांकः- 28/02/2022.मी गणपत दिपसिंग राठोड, वय 65 वर्षे, धंदा शेती रा. नांदा (बु) तांडा ता. भोकर जि. नांदेडमी वरील ठिकाणचा राहणार असुन, मला तीन मुले नामे 1) दत्ता राठोड 2) गोरखनाथ 3) यशवंत अशी आहेत.मी भोकर दिवाणी न्यायालयात शेती वाटणी संबंधाने दाखल केलेला दावा क्रमांक 181/2018 मध्ये दिनांक 18/09/2018 रोजी कोर्टातुन तडजोड होवुन जमीन माझा मुलगा दत्ता आणी पत्नी यांचे नावे करण्या बाबत डिक्री प्राप्त झाली आहे. या डिक्री प्रमाणे शेतीचा फेरफार लावण्याची कार्यवाही होण्या करीता मी दिनांक 13/10/2021 व 27/10/2021 रोजी तहसीलदार, भोकर यांना अर्ज दिले होते. या अर्जाचे आनुशगाने कार्यवाही करून आदेश काढण्याचे काम तहसील कार्यालयातील लिपीक जवळेकर यांच्याकडे प्रलंबीत होते. ते काम करण्याकरीता मी त्यांना 21/02/2022 रोजी तहसील कार्यालय भोकर येथे भेटलो असता त्यांनी मला हे काम करण्यासाठी पन्नास हजार रूपये द्यावे लागतील म्हणाले. त्यांनी केलेली पन्नास हजाराची मागणी ही लाचेची मागणी असल्या कारणाने मी त्यांच्या विरूध्द कायदेशीर कार्यवाही व्हावी याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे दिनांक 22/02/2022 रोजी तक्रार दिली.मी दिलेल्या तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उप अधिक्षक श्री अशोक ईप्पर यांनी दिनांक 23/02/2022 रोजी ला.प्र.वि. नांदेड कार्यालय नांदेड यांनी पथकातील सदस्य स.पो.उप.नि.शेटे, पो.नाईक. श्री गंगातीर्थ, पो.कॉ.श्री ईश्वर जाधव, चालक ना.पो.कॉ.मारोती सोनटक्के तसेच पंच साक्षीदार क्रं.1) शैलेश जुगदार व क्र.2) श्री बालाजी केंद्रे यांचा परिचय करून दिला. पो.कॉ ईश्वर जाधव यांनी नविन मेमरी कार्ड डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यात पो.उप.अ.श्री ईप्पर यांचे, माझे, तसेच दोन्ही पंचाचे परिचय दर्शक वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. खाजगी वाहनाने पो.उप.अ.श्री ईप्पर, पो.कॉ ईश्वर जाधव पंच क्रं.1) शैलेश जुगदार व मी असे खाजगी वाहनाने लाचमागणीची पडताळणी करीता भोकर येथे आलोत. महाराष्ट्र शासन कर्मचारी यांचा संप असल्या कारणाने लोकसेवक जवळेकर यांची भेट झाली नाही.दिनांक 25/02/2022 रोजी पो.उप.अधिक्षक ईप्पर हे पथकासह शासकीय वाहनाने भोकर येथे आले. लाचमागणी पडताळणी कार्यवाही करीता मला पथक सदस्याना, तसेच पंचाना सुचना दिल्या नतर माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पो.कॉ. ईश्वर जाधव यांनी दिला. मी व पंच क्रं.1) शैलेश जुगदार यांच्या सोबत खाजगी मोटरसायकलने तहसील कार्यालय भोकर येथे जावुन लोकसेवक महसुल सहायक जवळेकर यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान मी लोकसेवक महसुल सहायक जवळेकर यांना माझे प्रलंबीत कामासंबधी विचारणा केली असता त्यांनी सांगीतलोना तुम्हाला म्हणाले. मी त्यांना जास्त होते हो. येवढे जास्त होते हो. काही तरी कमी करा. त्यांनी किती कमी करू? म्हणुन मला विचारले. मी त्यांना दहा कमी करा म्हणालो. त्यावर लोकसेवक महसुल सहायक जवळेकर यांनी तडजोडीअंती चाळीस हजार रूपयांची मागणी करून स्विकारण्याची तयार दर्शवीली. त्यांना चाळीस हजार रूपयांची व्यवस्थाकरून देण्याकरीता वेळ मागुण घेतला. व परत पथकाजवळ जावुन घडलेली हकीगत क्रं.1) श्री शैलेश जुगदार तसेच मी पो.उप.अ.श्री ईप्पर साहेबांना सांगीतली. सापळापुर्व कार्यवाहीत पो.ना.गंगातीर्थ यांनी अॅन्थ्रासीन पावडरचे प्रात्यक्षीक वाहनात कृत्रीम अंधार करून, दाखवीले. माझी अर्थिक परस्थिती गरीबीची असल्यामुळे

पाचशे रूपये दराच्या दहा चलनी नोटा असे पाच हजार रूपये मी पो.उप.अ.श्री ईप्पर साहेब यांच्याकडे दिल्या. त्यांनी त्यानंतर पाचशे रूपयांचे नोटांसारख्या दिसणा-या खेळणी सत्तर नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन दिले. या प्रमाणे लाचेची रक्कम तयार करून, माझे ताब्यात दिले. लोकसेवक महसुल सहायक जवळेकर यांना त्यांचे मोबाइलवर संपर्क केला असता त्यांनी मोंढा भोकर येथील हनुमान मंदीरा जवळ येण्यास सांगीतले. त्या प्रमाणे हनुमान मंदिर मोंढा भोकर येथे सापळा लावण्यात आला. तेथे लोकसेवक महसुल सहायक जवळेकर मोटरसायकलने आले. मला भेटुन,कोणत्या आडतीकडे गेलत्या? म्हणुन मला विचारणा केली. मी त्यांना आमच्या गावचे दत्तरामचे म्हणुन सांगीतले. त्यांनी मला गाडीवर बसण्यास सांगीतले. मी त्यांना गाडीवर कशाला? म्हणुन विचारले. असता त्यांनी मला गाडीवर बसा हो दोन मिनट. म्हणुन अग्रह केला. मी त्यांना पुन्हा गाडीवर कशाला? असे म्हणुन गाडीवर बसण्यास नकार दिला. त्यानंतर त्यांनी मला थांबता का? पाच दहा मिनट जावुन येतो ऑफीसला. म्हणुन निघुण गेले. मी तासभर त्यांची वाट पाहुन पथकास भेटुन त्यांना फोन केला व सर मला उशीर व्हायला मंदीरा जवळ बसलो आहे. म्हणुन त्यांना सांगीतले. त्यांनी मला काम लागले आहे. उद्या भेटा म्हणुन सांगीतले. लाचेची रक्कम पो.उप.अ.श्री ईप्पर साहेबाकडे दिली.दिनांक 26/02/2022 रोजी पो.उप.अ.श्री ईप्पर यांचे पथकाकडुन करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक महसुल सहायक जवळेकर याना मोबाईलवर दोन कॉल केले. त्यांनी फोन घेतलाच नाही. संपर्क झाला नाही. त्यानंतर सायंकाळी अंदाजे पाच वाजता महसुल सहायक जवळेकर यांनी मला कॉल करून कसकाय कॉल केला होता? म्हणुन विचारले. मी त्यांना पैसे घेवुन आलो होतो. उद्या मार्केट बंद असते. सोमवारी येतो. म्हणुन सांगीतले. ही बाब मी पो.उप.अ.श्री ईप्पर यांना फोन करून सांगीतली.आज दिनांक 28/02/2022 रोजी पो.उप.अ.श्री ईप्पर यांनी त्यांचे पथकासह भोकर येथे येवुन मला पंचाना व पथक सदस्यांना सुचना देवुन, लाचेची रक्कम माझे ताब्यात देण्यात आली. मला लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर गळ्यातील मोठी दस्ती काढुन हातात धरण्याचा ईशारा करण्याची सुचना दिली. पो.कॉ. ईश्वर जाधव यांनी माझे ताब्यात डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून दिला. मी व पंच क्र.1) शैलेश जुगदार असे दोघे खाजगी मोटरसायकलने तहसील भोकर येथे आलोत. पथकाकडुन लावण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान क्र.1) शैलेश जुगदार यांच्या समक्ष तहसील कार्यालय भोकर येथे महसुल सहायक जवळेकर यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान महसुल सहायक जवळेकर यांनी मला आणले का? म्हणुन विचारले. मी त्यांना चाळीस हजार रूपये आणले. आमचे काम करून द्या म्हणुन सांगीतले. त्यावर लोकसेवक महसुल सहायक जवळेकर तलाठ्याकडे पाठवतो. तलाठी यांना मी साहेबांना सांगायला लावतो. असे म्हणुन त्यांच्या कार्यालयातुन मागील बाजुस खालच्या मजल्यास उतरण्याचे पाय-यांवर मला लाचेची रक्कम मागीतली. त्यांनी स्वतःचे खिशातील हातरूमाल बाहेर काढला. त्यावर लाचेची रक्कम ठेवण्यास सांगीतली त्या प्रमाणे मी रक्कम हातरूमालावर ठेवली असता, त्यांनी ती रक्कम हातरूमालात गुडांळुन पन्टच्या समोरील डाव्या खिशात ठेवुन लाचेची रक्कम स्विकारली आहे. त्यानंतर मला दिलेल्या सुचने प्रमाणे मी अंदाजे 13.47 वाजताचे सुमारास पथकास ईशारा केला. त्यानंतर पथकाने तात्काळ येवुन लोकसेवक महसुल शाखेतुन बाहेर जाताना त्यांना ताब्यात घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यवाही असल्याचे सांगुन झडती घेवुन, नाव गाव विचारले असता, उल्हास मधुकरराव जवळेकर, वय 46 वर्षे , महसुल सहायक, तहसील भोकर, मुळ रा. जवळा बाजार, ता. औंढा, जि. हिंगोली. ह.मु. बिजनवाड यांचे घरी भाड्याने, अष्टविनायक नगर, पवार कॉलनी भोकर असे सांगितले. पथकाकडुन पंचनामा करण्यात आला. एकंदरीत शेती वाटपा संबंधाने दाखल दिवाणी दाव्यात तडजोड होवुन, न्यायालयाने दिलेल्या डिक्री प्रमाणे शेतीचा फेरफार लावण्याचा आदेश तलाठ्यास देण्याची कार्यवाही करीता लोकसेवक उल्हास मधुकरराव जवळेकर, महसुल सहायक, तहसील कार्यालय भोकर यांनी पंच क्र.1) शैलेश जुगदार यांच्या समक्ष स्वतःच्या आर्थीक फायद्याकरीता पदाचा गैरवापर करून, मला पन्नास हजार रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती चाळीस हजार रूपये स्विकारण्याचे मान्य करून, तहसील कार्यालय भोकर येथे आज दिनांक 28/02/2022 रोजी अंदाजे 13.47 वाजताचे सुमारास चाळीस हजार रूपये लाचेची रक्कम स्विकारली आहे. तरी लोकसेवक उल्हास मधुकरराव जवळेकर, महसुल सहायक, तहसील कार्यालय भोकर यांच्या विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अंतर्गत कायदेशीर कार्यवाही व्हावी म्हणुन माझी फियांद आहे. ही फियांद दिली - --sd--

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): VIKAS SHEKUJI PATIL(I (Inspector)) / POBN62686 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): VIKAS SHEKU[illegible]
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN62686